# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एनजीपी/प्रवेश नियम/२०११/ ७२८

दिनांक : 7 सितम्बर SEP 2011

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नागपूर.

**विषयः- शासकीय तंत्रनिकेतनातील व्दितीय वर्षामध्ये रिक्त असलेल्या जागांवर थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी प्रवेशाबाबत....**

उपरोक्त विषयासंदर्भात, आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतनातील थेट व्दितीय वर्षातील प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आल्यानंतरही ज्या जागा रिक्त आहेत, अशा थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेनुसार संस्था स्तरावर भरण्यास मान्यता देण्यात येत आहे. तरी, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांना त्याबाबतच्या आवश्यक त्या सूचना व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही आपल्या स्तरावरुन तात्काळ करण्यात यावी.

तसेच सदर प्रवेशप्रक्रीयेची शेवटचीत तारीख १५/९/२०११ पर्यंत आहे. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी संकेत स्थळावर दिनांक २०/९/२०११ पर्यंत अपलोड करण्याचे आदेश द्यावेत.

आपला

(डॉ. सुभाष महाजन)

प्र.संचालक., तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**********************************************************************************

जा.क्र. तंशि/विकाना/तांशा/२०११/ 1496

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

दिनांक 12 सितम्बर SEP 2011

प्रति,

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन,

नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, नंदुरबार

२/- त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर पत्रातील सूचनेप्रमाणे संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ साठी अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या थेट व्दितीय वर्षासाठीच्या रिक्त जागा **दिनांक १५.९.२०११** पर्यंत भरण्यात याव्यात असे कळविले आहे. वरील सूचनांचे पत्र **www.dte.org.in/poly2011** या वेब साईट उपलब्ध आहेत याची नोंद घेउन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(दि.रा.नंदनवार)

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

२/- सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.